
# १४. पाऊस–पाणी


- **ऐका व म्हणा.**


टप्टप् थेंबांनी तळे साचले.
धोधो पावसाने धरण भरले.
धरणाचे पाणी शेतात खेळे.
धान्याचे कणीस वाऱ्यावर डुले.
हिरवी धरती आनंदाने डोले.
पावसाने दिले सर्वांना पाणी.
शेतकरी गातो पावसाची गाणी.






- **पाहा. ऐका. म्हणा.**



तळे


धरण


कणीस


शेत


शेतकरी


पाऊस

- **शब्द ऐका. सारखी अक्षरे ओळखा. वाचा.**

| | | | |
|---|---|---|---|
| शेत | पाणी | पाऊस | धरती |
| शेतकरी | गाणी | पाणी | धरण |
| शे | णी | पा | ध |

- **ऐका. म्हणा.**

शे णी पा ध

- **वरील अक्षरांनी सुरुवात किंवा शेवट होणारे तुम्हांला माहीत असणारे शब्द सांगा.**

- **जोड्या जुळवा.**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| तळे | धरण | कणीस | शेत | शेतकरी | पाणी | गाणी |
| धरण | कणीस | तळे | पाणी | शेत | गाणी | शेतकरी |

- पाहा. ऐका. समजून घ्या. वाचा.

| | | |
|---|---|---|
| श | े | शे |
| श | ा | शा |
| ण | ा | णा |
| ध | ा | धा |

| | | |
|---|---|---|
| ण | ी | णी |
| श | ी | शी |
| प | ी | पी |
| ध | ी | धी |

| | | |
|---|---|---|
| प | ा | पा |
| श | ू | शू |
| ण | ू | णू |
| प | ू | पू |
| ध | ू | धू |

| | | |
|---|---|---|
| ण | े | णे |
| प | े | पे |
| ध | े | धे |


- खालील अक्षरांना जोडलेली े, ी, ू, ा ही चिन्हे गिरवा. वाचा.

पे पी पू से सू सी मे मा सा


- चित्रे पाहा. नावे वाचा.


लसूण


पाल


फणस


साडी


पेन


पालक


पाय


कप


पीस


साप

- ऐका. वाचा.


कडकड, धडधड, फणफण, शाल, आपला, एकी, कीड, आपली,
आपले, लालेलाल, केस, तेल, पेला, फेस, शेकणे.

- चित्रे पाहा. समजून घ्या. नावे वाचा.


ससा


ससे


मासा


मासे

- **खालील शब्द उलट-सुलट वाचा.**

डालडा, कडक, नयन, नमन.

8E4NFV

- **पाहा. गिरवा. लिहा. वाचा.**

ऊ ..........

श .......... शा .......... शी .......... शू .......... शे ..........

प .......... पा .......... पी .......... पू .......... पे ..........

फ .......... फा .......... फी .......... फू .......... फे ..........

ण .......... णा .......... णी .......... णू .......... णे ..........

- **वरील अक्षराने सुरुवात किंवा शेवट होणारे तुम्हांला माहीत असलेले शब्द लिहा.**

- **पाहा. सांगा - पाणी कशासाठी ?**










**शिक्षकांसाठी :** १. विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रासंबंधी बोलायला सांगावे. चित्रांचे वर्णन करणारे शब्द सांगावे. चित्रात दाखवल्यापेक्षा पाण्याचे वेगवेगळे उपयोग विचारावे. २. या पाठापर्यंत झालेल्या अक्षरांना े, ी ही चिन्हे जोडून वाचून घ्यावे.